माजी सैनिकांची वर्ग ३ व वर्ग ४ मधील त्यांचे साठी असलेल्या राखीव पदावर भरती करणे- बाबतच्या सवलती........

---

**महाराष्ट्र शासन,**
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक -अेपीटी-१४००/१९६६७/३४४४/१२,
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२, दिनांक १४ मे १९८६.

वाचा :-

१) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७२/६१८१/५ दिनांक ३० एप्रिल १९७३.

२) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७३/पाच दि. ८ मे १९७३.

३) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७३/पाच, दि. ८ ऑक्टोबर १९७३.

४) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७४-१२३०-५ दि.१६/२५ नोव्हेंबर १९७५.

५) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७६-६२५-२९९ /१६ दि.२२ फेब्रुवारी १९७६.

६) शासन निर्णय , क्रमांक -आयटीएन-१०७६/६३५/२९९/१६ दि. --------------१९७६.

७) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७७/१२४८/----/१६ दि. ५ ऑगस्ट १९७६

८) शासकीय परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक -आरटीए-१०७७/१०६८/१६ दिनांक ३ सप्टेंबर १९७७.

९) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७९-०-४८२-१६अ, दिनांक २५ ऑक्टोबर १९७९.

१०) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७९-४८२-१६, दिनांक ३.७.८०

११) शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०७९-४८२-१६ अ, दिनांक १६.४.८१

१२) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०८२-१५३६-सीआर ३६/१६ अ, दिनांक ९.६.८२

१३) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०८२-३५०२-सीआर-१००/१६ अ,दिनांक २ सप्टेंबर ८३

१४) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक -आरटीए-१०८२-१५३६-सीआर ३६/१६ अ,दिनांक २०/६/८४.

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.

# परिपत्रक

शासनाने माजी सैनिकांसाठी वर्ग ३ व वर्ग ४ मधील त्यांचेसाठी राखीव पदावर भरती करण्याबाबत वेळोवेळी काढलेल्या आदेशांच्या प्रती, सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, मसामान्य प्रशासन विभाग क्र. आयपीईआरटिए १०८०/०/११८१/१६ अ दिनांक १०.१०.८० अन्वये निर्गमित केलेला आहेत. शासकीय पृष्ठांकन ग्राम विकास विभाग क्र. अेपीटी १६७३/४७९२९/सीएन २४७(अे) डेस्क-४, दि. १७ एप्रिल १९७६ अन्वये खाली दर्शविलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाच्या प्रती(अ) सर्व विभागीय आयुक्त आणि चेअरमन विभागीय निवड मंडळे (ब) सर्व जिल्हाधिकारी आणि चेअरमन जिल्हा निवड मंडळ (क) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी निर्गमित केल्या आहेत.

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. आरटीए १०७३/५ दि. ८ मे ७३

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. आरटीए १०७३/५० दि. ८ ऑक्टोंबर ७३

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.आरटीए १०७४/१२३०/(०)५/७५/१६ दि. २९ नोव्हेंबर ७५.

ग्राम विकास विभाग, पृष्टांकन क्र. अेपीटी २२७८/४५३०/४ दिनांक २३ डिसेंबर ७८ अन्वये शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. आरटीए १०७७/१०६८/१६ दि. ३.९.७७ च्या प्रती सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदा यांना पाठविण्यात आल्या आहेत.

२. माजी सैनिकाचा पुनर्वसनाचा प्रश्न हा नित्याची समस्या असल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आरटीए १०७९/०/४८२/१६ अ दि. १.७.८० अन्वये माजी सैनिकांकरिता शासकीय सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये असलेले १५ टक्के पदाचे आरक्षण कायम स्वरूपात करण्यांत आलेले आहे. त्यानुसार सध्याचे महाराष्ट्र जिल्हा परिषद (सेवा भरती) नियम १९६७ मधील नियमातं माजी सैनिकांसाठी पदांचे आरक्षण व इतर सवलती देण्याबाबतच्या सुधारणा करणे आवश्यक आहे. यासाठी काही कालावधी लागणे अपरिहार्य असल्यामुळे शासन पृष्ठांकन ग्राम विकास विभाग, क्र. अेपीटी १६७३/४७९२९/सीएन २४७/(अे) डेस्क-४, दि. १७.४.७६ आणि क्र. अेपीटी २२७८/४५३०/चार, दि. २३ डिसेंबर ७८ चे आदेश निष्प्रभावित करून शासन आता असे आदेश देत आहे की,

१) जिल्हा परिषदेमधील सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी (वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये) प्रतिवर्षी जी पदे उपलब्ध होतील त्यापैकी १५ टक्के पदे माजी सैनिकासाठी राखून ठेवण्यात यावीत.

अ) माजी सैनिकांसाठी वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये मधील आरक्षित असलेल्या १५ टक्के पदांवर भरती करतांना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांना १५ टक्के राखीव पदापैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्त करावे.

ब) युध्द काळात किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंती क्रमाने वर्ग ३ व वर्ग ४ मधील १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्त करावे.

२. हे आदेश निवड मंडळाच्या कक्षेत असणाऱ्या पदांसाठी त्याचप्रमाणे निवड मंडळाच्या कक्षेबाहेर असणाऱ्या अशा सर्व पदावर नेमणूका करण्यासाठी लागू आहेत.

३.	वर्ग ३ व वर्ग ४ पदांसाठी राखीव जागावर नेमणुक करण्यासाठी माजी सैनिकांची ६ महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची सेवा केंद्र शासनाच्या सशस्त्र दलात व्हावयास हवी अशा सैनिकांचे बाबतीत त्यांच्या सशस्त्रदलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे, इतकी जिल्हा परिषदेतील पदावर नेमणुकीसाठी विहित वयोमर्यादेत सुट देण्यात यावी. विकलांग (Disbled)माजी सैनिकांच्या बाबतीत वयोमर्यादेत ४५ वर्षापर्यंत सुट देण्यात यावी. ही सवलत त्यांना बिनराखीव जागा भरण्याच्या प्रसंगीही देण्यात यावी.

४.	(अ) ज्या माजी सैनिकांची सशस्त्र दलांतील सेवा ३ वर्षापेक्षा कमी झालेली नाही अशा माजी सैनिकाला वर्ग ४ मधील राखीव पदावर नेमणुकीसाठी शैक्षणिक पात्रतेच्या चौथी पास या अटीची सुट देण्यात यावी.

(ब) वर्ग ३ मधील ज्या राखीव पदासाठी मिडलस्कुल परिक्षा पास किंवा त्यापेक्षाही कमी दर्जाची परिक्षा पास अशी शैक्षणिक पात्रता विहित करण्यात आलेली आहे, त्या पदांवर ज्या माजी सैनिकांची सशस्त्र दलांत तीन वर्षाहून कमी सेवा झालेली नाही अशांची नेमणुक करतांना ते जर इतर अटीची पुर्तता करत असतील तर त्यांचा इतर पात्रता व अनुभव विचारात घेऊन त्यांचे बाबतीत शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करावी किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार नियुक्ती अधिकाऱ्याचा राहिल परंतु वर्ग ३ मधील लिपिक, टंकलेखक या सारखी इतर पदे ज्याच्यासाठी कमीत कमी शैक्षणिक पात्राता एस.एस.सी. परिक्षा पास विहित करण्यात आलेली आहे अशी पदे शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करण्याच्या पदांमध्ये समाविष्ट नाहीत. ज्या वर्ग ३ मधील पदावरील नेमणुका या अंशत /सरळ सेवा भरतीने व अशंत: पदोन्नतीने अथवा बदलीने करण्यात येतात व अशा पदावर सरळ सेवा भरतीने नेमणुकीसाठी विहित केलेली किमान शैक्षणिक अथवा तांत्रिक पात्रता ही पदोन्नती अथवा बदलीने नेमणूक करण्यात उमेदवारांसाठी विहित केलेल्या शैक्षणिक अथवा तांत्रिक पात्रेपेक्षा अधिक असेल तर अशा पदापैकी राखीव पदावर माजी सैनिकांची नेमणुक करताना माजी सैनिकांबाबत पुढील बाबी लक्षात घेऊन तो विहित शैक्षणिक अथवा तांत्रिक अर्हता धारण करीत आहे असे समजावे.

अ) ज्या संवर्गात या पदांवर उमेदवारांची पदोन्नतीने अथवा बदलीने नेमणूक करण्यात येते त्या पदांवर सरळ सेवा भरतीने नेमणूक करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अथवा तांत्रिक पात्रता धारणकरीत असेल तर.....

आणि	ब) अशा पदावर पदोन्नतीने अथवा बदलीने नेमणूक करण्यासाठी अनुभवाची अट विहित केली असेल तरे सशस्त्र दलांतील तत्सम पदावरील अनुभव व कालावधी त्यासाठी विचारांत घेण्यात येईल.

५.	निरनिराळ्या संवर्गातील कपात केलेल्या (Retrenched) वर्ग तीन व चार मधील सर्व कर्मचारी वर्गाला सेवेत सामावून घेतल्यानंतर माजी सैनिकांना सेवेत घ्यावे.

६.	योग्य शैक्षणिक अर्हता असलेले माजी सैनिक/अपंग माजी सैनिक नेमणुकीसाठी उपलब्ध न झाल्यामुळे रिक्त राहिलेल्या पदाचा अनुशेष १ वर्षाच्या कालावधीसाठी पुढे ओढण्यात यावा. माजी सैनिक उपलब्ध नसल्याबद्दल चा दाखला संबधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय व राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचेकडून प्राप्त करून घेतल्यानंतरच आरक्षित जागा अनारक्षित कराव्यात.

७.	काही संवर्गात पदांच्या कमी संख्या असतात आणि वरचेवर जागा रिक्त होत नाहीत. त्यामुळे माजी सैनिकांसाठी वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये जरी १५ टक्के पदे राखीव असली तरी भरतीसाठी फारच थोडा वाव असतो. म्हणून जिल्हा परिषदेमध्ये

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.

संपूर्ण कॅलेंडर वर्षात जिल्हा परिषदेच्या वर्ग ३ मधील सर्व संवर्गात व वर्ग ४ मधील सर्व संवर्गात जेवढया एकूण रिक्त जागा प्राप्त होतील त्याच्या एकूण १५ टक्के पदे त्या त्या वर्गात राखून ठेवावीत.

८. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विंनती करण्यात येते की, त्यांनी निवड मंडळाकडे उमेदवारांची मागणी करतांना वर्ग ३ मधील पदावर नेमणूका करण्यासाठी माजी सैनिकांकरिता विहीत टक्केवारीनुसार आरक्षित असलेल्या जागांच्या संख्येचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

९. सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेली १५ टक्के वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे तसेच जी पदे निवड मंडळाच्या कक्षेत येत नाहीत आणि जेथे १ वर्षापेक्षा जास्त नाहीत अशा मुदतीची रिक्त पदे. (Temporary vacancies not exceeding one year's duration) आहेत अशी पदे भरताना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी-

अ) माजी सैनिकांसाठी १५ टक्के राखीव जागा त्या त्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडे किमान १५ दिवस अगोदर उमेदवार पुरस्कृत करण्यासाठी कळविण्यात याव्या आणि सदर मंडळांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारातून भराव्यात. ज्या जिल्ह्यांत सैनिक कार्यालये अस्तित्वात नाहीत अशा जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणीपत्र पाठवावे.

ब) एकूण जागापैकी किती तात्पुरत्या जागा माजी सैनिकांसाठी राखून ठेवल्या आहेत, याची मागणी पत्रात स्पष्ट उल्लेख करावा.

क)जेव्हा राखीव जागेसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय योग्य तो उमेदवार पाठवू शकत नसेल, तर त्या जागेसाठी मागणीपत्र सचिव, राज्य सैनिंक कल्याण विभाग, पुणे यांचेकडे पाठविण्यात यावे. सचिव, राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे हे या मागणीनुसार योग्य त्या उमेदवारांची नांवे संबधित नियुक्ती अधिकाऱ्यांकडे पुरस्कृत करतील.

ड) तांत्रिक स्वरुपाच्या ज्या जागा जिल्हा संबर्गाव्यतिरिक्त आहेत अशा जागांसाठी सचिव, राज्य सैनिक कल्याण विभाग , पुणे यांजकडे मागणीपत्र पाठवावे, या संदर्भात सचिव, राज्य सैनिक कल्याण विभाग पुणे सर्व जिल्हा सैनिक मंडळाकडे योग्य त्या उमेदवारांसाठी विचारणा करतील आणि माजी सैनिकांची नावे पुरस्कृत करतील.

इ) नियुक्ती अधिकाऱ्यांनी सैनिक मंडळाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नियुक्ती केली आहे किंवा नाही यासंबंधीची माहिती एक महिन्यात त्या त्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडे पाठवावी. जर एखादी जागा माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या सैनिक कल्याण कार्यालय पुरस्कृत उमेदवारांमधून भरण्यात आली नसेल तर त्या बाबतची कारणे नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्या त्या सैनिक कल्याण कार्यालयास कळवावीत.

१०. माजी सैनिकांसाठी वर्ग ३ मधील ज्या राखीव जागा विभागीय निवड मंडळे किंवा जिल्हा निवड मंडळे यांच्या मार्फत सरळ सेवा प्रवेशाने भरावयाच्या असतील त्याबाबत विभागीय निवड मंडळाने/जिल्हा निवड मंडळाने संबंधित जिल्ह्यातील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय आणि राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे यांना कळवावे. जिल्हा सैनिक उमेदवार त्या त्या निवड मंडळाकडे त्यांच्या जाहीरातीनुसार राखीव जागांसाठी पुरस्कृत करावेत.

११. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदा वर्ग ३ व ४ च्या पदासाठी जाहीरात देताना माजी सैनिकांसाठी वयोमर्यादेची अट शिथील करण्याबाबत असलेल्या सवलतीचा स्पष्टपणे उल्लेख जाहिरातीत करीत नाहीत.

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.

त्यामुळे राखवी पदास पात्र असलेला माजी सैनिक या सवलतीचा फायदा घेण्यापासून वंचित राहतो. माजी सैनिकांसाठी आरक्षित केलेल्या वर्ग ३ व ४ च्या पदावर नेमणूकीसाठी जाहीरात देताना जाहिरातीत माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा शिथील करण्याबाबतच्या सवलतीचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, नाही याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

१२. विभागीय/जिल्हा निवड मंडळाकडून सरळ सेवा भरतीने मुलाखत घेऊन वर्ग ३ ची पदे भरत असताना केंद्र शासनाच्या सशस्त्र दलामध्ये सेवेचा नियम कालावधी पूर्ण झाला आहे अशी माजी सैनिकांना परिक्षाशुल्क व अर्जाचे शुल्क यापासून सूट देण्यात यावी.

१३. शारीरिक दृष्ट्या अपंग व्यक्तीसाठी वर्ग ३ व वर्ग ४ मधील उचित पदे शा.नि. एपिटी १४८०/१७६२४/४३५७/४, दिनांक २८ मे १९८२ सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब मध्ये दर्शविली आहेत. त्या यादींचा उपयोग अपंग माजी सैनिकांच्या नियुक्तीसाठी विचार करताना करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ज.अ.करवीकर)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालाचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
खाजगी सचिव (सर्व मंत्री), महाराष्ट्र राज्य,
खाजगी सहाय्यक (सर्व मंत्री), महाराष्ट्र राज्य
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संचालक, महाराष्ट्र सैनिक कल्याण विभाग, पुणे
सचिव सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय (द्वारा सबंधित जिल्हाधिकारी)
सर्व मंत्रालयीन विभाग
ग्राम विकास विभाग कार्या. १३ (सेवाभरती नियमात आवश्यक ती दुरूस्ती करण्यासाठी)

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.